राजेंद्र शेळके

कार्यकारी अधिकारी श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती

कार्यकारी अधिकारी, श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर यांचे कार्यालय
जि. सोलापूर – ४१३३०४
फोन नं –(०२१८६)२२४४६६/२२३५५०
ईमेल – eotemple@gmail.com


जा. क्र. भक्त निवास का.वि./ /२०२५ दिनांक: २०/०६/२०२५

प्रति,

______________
______________
______________

विषय : भक्तनिवास येथे गादी दरपत्रक पाठविणे बाबत..

उपरोक्त विषयास अनुसरून, भक्तनिवास विभागासाठी गादी साधारणत: ३५० नग साहित्य पुरवठा करणेकामी दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सदर साहित्याचे सविस्तर तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | आकार | दर प्रति नग |
|---|---|---|---|
| १ | गादी (फोम व हिटलॉन) ३" ई पी (हिटलॉन) ४० डेंसीटी व १" फोम बीडींगसह फुल डेंसीटी | लांबी ७४ x रूंदी ३५ | १०० |
| २ | गादी (फोम व हिटलॉन) ३" ई पी (हिटलॉन) ४० डेंसीटी व १" फोम बीडींगसह फुल डेंसीटी | लांबी ८१ x रूंदी ३५ | २५० |
| | | एकुण | **३५०** |

तरी आपलेकडील छापील कोटेशनवर सही शिक्क्यासह दरपत्रक दि. २७/०६/२०२५ रोजी सायं. ०५.०० वाजेपर्यंत श्री संत तुकाराम भवन, पंढरपूर येथे सिलबंद लिफाफ्यात सादर करावे. सिलबंद लिफाफ्यावर खालील तपशील नमुद करावा.

**"भक्तनिवास येथील गादी खरेदी दरपत्रक"**

**पुररवठा धारकाचे नांव, पत्ता, मोबाईल क्रमांक**

उशीरा प्राप्त होणाऱ्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही. सोबत दरपत्र माहिती, अटी व शर्तीची प्रत जोडली आहे.

व्यवस्थापक,
श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर

श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती,पंढरपूर जि.सोलापूर –४१३३०४

भक्तनिवास विभाग/का.वि./ /२०२५

श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती,पंढरपूर यांचे भक्तनिवास विभागासाठी (फोम व हिटलॉनची) गादी पुरवठाकामी सिलबंद लिफाफा पध्द्तीने दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

०१) सदर पुरवठा कामाच्या माहितीचे बुकलेट कार्यालयीन वेळेत श्री.संत तुकाराम भवन,पंढरपूर येथे उपलब्ध होवून मिळतील. दरपत्रक स्वतंत्र सिलबंद लिफाफ्यात दि.२७/०६/२०२५ सायंकाळी ०५.०० पूर्वी सादर करणे आवश्यक आहे.लिफाफ्यावर ठेकेदाराचे नाव व पूर्ण पत्ता आणि दरपत्रक भक्तनिवास (फोम व हिटलॉनची) गादी पूरवठाकामी भरलेले आहे, असा सविस्तर तपशिल नमुद करावा. दरपत्रक समक्ष श्री संत तुकाराम भवन येथे सादर करावेत किंवा रजिस्टर पोष्टाने पाठवावे. उशीरा आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाहीत.

०२) सदर बाबात अधिक माहीतीसाठी संपर्क क्रमांक : ०२१८६ – २२८८८८

०३) वरील पुरवठा कालावधीत सदर प्रक्रियेस विलंब झाल्यास, बदल झाल्यास त्याचे सर्व अधिकार कार्यकारी अधिकारी श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती यांनी राखून ठेवलेले आहेत.

०४) कोणतेही दरपत्रक अगर सर्वच दरपत्रके कोणतेही कारण न दर्शविता नाकारणे किंवा स्विकारणे अथवा स्थगित ठेवणे किंवा रद्द करणे याबाबतचे संपूर्ण अधिकार मंदिरे समितीने राखुन ठेवलेले आहेत.

०५) पुरवठा धारकांच्या कोणत्याही शर्ती व अटी मंदिरे समितीवर बंधनकारक असणार नाहीत.

०६ )पुरवठा मालाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

०७) मंजुर पुरवठा धारकास मालाचा पुरवठा मंदिरे समितीचे मागणी नुसार पुरवठा आदेश दिल्यानंतर १५ दिवसांच्या आत करणे बंधनकारक आहे. त्यास विलंब झाल्यास पुरवठा धारकास जबाबदार धरून मालाच्या किंमतीच्या ५ % पर्यंत दंड आकारण्यात येईल.

०८) मालाचा पुरवठा मागणीप्रमाणे न आलेस अथवा योग्य प्रतीचा/गुणवत्तेचा नसल्यास अगर ठरवून दिलेल्या मुदतीत न झाल्यास मंदिरे समितीची अडचण होऊ नये. म्हणून द्वितीय, धारकांकडून अगर इतर पुरवठा धारकांकडून बाजार भावाने आवश्यकतेनुसार मालाची खरेदी करण्यात येऊन त्यासाठी जादा

लागलेल्या फरकाची रक्कम पुरवठा धारकाच्या बीलातून अथवा सुरक्षा अनामत रक्कमेतून वसुल करणेत येईल.

०९) पुरवठा कालावधीमध्ये शासकीय कार्यालयाकडून कर, ऊपकर, जकात यांचे दरामध्ये काही बदल झाल्यास त्याबाबत समिती व्व्वस्थापनाकडे मागणी करता येणार नाही.

१०) पुरवठा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/नैसर्गीक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी पुरवठाधारकांच्या नियंत्रणाबाहेर असेल उदा. आग, महापूर, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भुकंप वैगेरे) पुरवठाधारक मालाचा पुरवठा करू शकला नाही व त्यामुळे पुरवठाधारकाचे नुकसान झाल्यास, त्यासाठी मंदिरे समिती व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही.

११) माल खराब असल्याचे आढळून आलेस जेवढा खराब असेल तेवढा माल बदलून देणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील, माल चांगल्या गुणवत्तेचा व मागणीप्रमाणे असणे आवश्यक आहे. त्यामध्ये भेसळ असता कामा नये.

१२) पुरवठादाराने मंदिरे समितीने ठरवून दिलेल्या अथवा निश्चित केलेल्या प्रमाणामध्ये चांगल्या प्रतीचा व गुणवत्तेचा माल पुरवठा करावयाचा आहे. पुरवठा करण्यात आलेल्या मालाची प्रत, प्रमाण, गुणवत्ता संबधीत विभागाकडून मोज़णी व तपासणी करून खात्री झाले खेरीज बील अदा केले जाणार नाही.

१३) सदर कामाचा मंजुर दर व जी.एस.टी, व्यतिरीक्त इतर कोणतेही कर अदा केले जाणार नाही. तसेच सदर कामाचे बील अदा करताना नियमानुसार २% आयकर व जी. एस. टी. , टी. डी. एस. कपात केली जाईल. पुरवठा कामाचे देयके मासिक/एकरकमी अदा करण्यात येतील.

१४) सदर कामासाठी ॲडव्हान्स रक्कम अदा केली जाणार नाही.

१५) माल पुरवठा करण्याचे ठिकाण श्री विठ्ठल रूक्मिणी भक्त निवास पंढरपूर जि. सोलापूर राहील

१६) माल वाहतुकी दरम्यान झालेल्या कोणत्याही दुर्घटनेस पुरवठा धारक जबाबदार राहील.

१७) दरपत्रकात नमुद केलेल्या कामासाठी पुरवठा धारकाने दुसऱ्या पुरवठा धारकास काम दिल्याचे आढळल्यास पुरवठाधारकाचे मंजुर दरपत्रक रद्द करण्यात येईल.

१८) पुरवठा कामाचे देयक सादर करताना देयकामध्ये आदेशातील वर्णनाप्रमाणे संपूर्ण तपशील असणे आवश्यक आहे. संक्षिप्त स्वरूपात उल्लेख करू नये. देयक छापील स्वरूपात असावे. त्यामध्ये बील क्रमांक दिनांक, मालाचे वर्णन, दर, जी.एस.टी., सही, शिक्का, व इतर अनुषंगीक बाबीचा समावेश असावा.

१९) सदर कामाच्या अटी व शर्ती बाबत कोणत्याही पुरवठाधारकास न्यायालयामध्ये दाद मागता येणार नाही.

२०) कमी जास्त दराचे दरपत्रक स्विकारणेचा, नाकारण्याचा अथवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार मंदिरे समितीने राखुन ठेवलेला आहे. त्याबद्दलची कारणे, स्पष्टीकरण देणे मंदिरे समितीवर बंधकारक राहणार नाही.

२१) मंदिरे समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटी व शर्तीत जे बदल करेल ते पुरवठाधारकास बंधनकारक राहील.

२२) सदर कामासंबंधी काही वाद उद्भवल्यास त्यासाठी न्यायालयीने कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

२३) प्रसासकीय व अन्य कारणास्तव किंवा कोणतेही कारण न देता दरपत्रक प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द अथवा स्थगित ठेवण्याचा अधिकार मंदिरे समितीने राखुन ठेवलेला आहे.